**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गु.शा., गु.अ.वि., मुंबई यांचे कार्यालय.**

---

**-: प्रेस नोट :-** **दिनांक :- १७/०७/२०२६**

**मुंबईमध्ये अंमली पदार्थ विरोधी कारवाईत 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल्सचा अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या आरोपीतास अटक करून एकूण अं.रू.१,५७,०००/- किंमतीच्या कफ सिरपच्या बॉटल्स जप्त केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **अंमली पदार्थ विरोधी कक्ष** | आझाद मैदान, अं.प.वि.कक्ष, गु.शा., गु.अ.वि., मुंबई. |
| **अं.प.वि. कक्ष, गु.र.क्र.** | ६७/२०२६, कलम-८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस कायदा-१९८५ |
| **गुन्हा घडला दिनांक व वेळ** | दिनांक - १६/०७/२०२६ वेळ-१८:०० ते २०:०० वाजताचे दरम्यान |
| **दाखल दिनांक** | दिनांक -१७/०७/२०२६ रोजी ०३:५० वाजता. |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | पहिल्या मजल्यावरील रुम नं.१० च्या समोरील मोकळया जागी, ६९/७३, फजल बिल्डींग, न्यु काझी स्ट्रिट, पायधुनी, मुंबई-४००००३. |
| **आरोपी** | आसिफ ईक्बाल शेख, वय-३९ वर्षे, धंदा- चष्मा विक्री, रा.ठी.- रुम नं.०१, तळ मजला, १४७, युसूफ मंझिल, झकेरीया मस्जिद स्ट्रिट, मोहम्मद अली रोड, मस्जिद बंदर, मुंबई-४००००९. |
| **पाहिजे आरोपी** | तपासावर अवलंबुन |
| **जप्त मुद्देमाल व किं.अं.** | एकूण १५७ प्रतिबंधक 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल्स (अं.कि.रु.१,५७,०००/-) |
| **तपासी अधिकारी** | पो.उप नि.राम लिंगे, अं.प.वि.कक्ष, आझाद मैदान युनिट, गु.शा., गु.अ.वि., मुंबई. |

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीतील अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या इसमांविरूध्द कारवाई करणेबाबत मा.पोलीस उप आयुक्त, अं.प.वि.कक्ष, मुंबई व मा.सहायक पोलीस आयुक्त, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांनी आदेशित केले आहे. त्यावरून अशा अंमली पदार्थाची विक्री करीत असलेल्या संशयित इसमांच्या हालचालीवर अंमली पदार्थ विरोधी कक्षामार्फत विशेष निगराणी ठेवण्यात येत होती. दिनांक-१७/०७/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट, मुंबई हे गस्तकरीत असताना. पायधुनी परिसरामध्ये एका इसमाच्या ताब्यात 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या एकुण १५७ बॉटल्स मिळून आल्याने त्याच्याविरूध्द पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.७९९/२०२६, कलम-८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस कायदा-१९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर सदर गुन्हा पुढील तपासकामी अं.प.वि.कक्ष, आझाद मैदान युनिट, मुंबई येथे वर्ग करून गु.र.क्र. ६७/२०२६, कलम-८(क) सह २१(क) एन.डी.पी.एस कायदा-१९८५ गुन्हा नोंद करून पुढील तपास करीत आहोत. सदर गुन्ह्यात आरोपीने त्याच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या 'कोडेन फॉस्फेट मिश्रीत' कफ सिरपच्या बॉटल्स कोणाकडुन आणल्या याबाबत तपास सुरु आहे.

**अशा प्रकारे बृहन्मुंबई पोलीस हे अंमली पदार्थ मुक्त समाज निर्मितीसाठी सतत प्रयत्नशील आहेत.**

सदर कारवाई मा.श्री देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मुंबई, मा.श्री कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मुंबई, श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व श्री सुधिर हिर्डेकर, सहायक पोलीस आयुक्त, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आझाद मैदान, अं.प.वि.कक्ष, युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक, शैलेश सुर्यवंशी यांचे नेतृत्वाखाली आझाद मैदान युनिट, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांनी केली आहे.